INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# भर चौकातील अरण्यरुदन : एक आकलन

## (An Assessment of "Bhar Choukaatil Aranyarudan")

**मनोजकुमार कोसारे**
संशोधक विद्यार्थी,
संशोधन केंद्र तायवाडे कॉलेज,
कोराडी, नागपूर (महाराष्ट्र, भारत)

**डॉ. कोमल ठाकरे**
मार्गदर्शक,
संशोधन केंद्र तायवाडे कॉलेज,
कोराडी, नागपूर (महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/05.2025-96848216/IRJHIS2505017

***गोषवारा*** *:*

*'भर चौकातील अरण्यरुदन' ही कादंबरी भांडवलशाही आणि सरंजामी व्यवस्थेमध्ये निरागस निरक्षर माणसांची होणारी कोंडी, त्यांचे शोषण, आणि भांडवलशाही व्यवस्थेची बटीक झालेली शासन व्यवस्था या साऱ्यांचे अत्यंत वास्तववादी चित्रण मांडणारी आहे. मल्लराजचा मृत्यू हा येथील समाजवास्तवाचे व्यवस्थेचे पितळ उघडे पाडणारा आहे. कादंबरीचा निवेदक मल्लराजाच्या कथेसोबत स्वतःचे जीवन देखील उजागर करताना दिसतो.*

***सूचक शब्द :*** *सरंजाम, भांडवलशाही, शोषण, अनैतिक, अत्याचार*

**प्रस्तावना :**

साठोत्तरी कालखंड हा मराठी कादंबरीच्या विकासाचा कालखंड म्हणून ओळखला जातो या कालखंडामध्ये मराठी कादंबरीचा प्रवास रंजकतेकडून वास्तववादी जाणीवांकडे जीवनवादी जाणीवांकडे होताना दिसतो. या कालखंडात विविध वाङ्मयीन चळवळी आकारास आल्या. या कालखंडामध्ये ग्रामीण दलित, मार्क्सवादी , जनवादी, स्त्रीवादी , चरित्रात्मक, वास्तववादी अशा नवीन प्रवाहांमधून नवोदित लेखक लेखन करू लागले या कालखंडामध्ये ग्रामीण , दलित समाजातून आलेले नवलेखक सुद्धा त्यांचे अनुभवजीवन वास्तव साहित्यातून मांडू लागले या कालखंडात अनेक नवे लेखक उदयास आले. त्यामध्ये प्रामुख्याने भालचंद्र नेमाडे नागनाथ कोत्तापल्ले, रंगनाथ पठारे ही नावे विशेष उल्लेखनीय. रंगनाथ पठारे हे १९७५ च्या कालखंडाच्या सुमारास लेखनास प्रारंभ करणारे महत्वाचे साहित्यिक आहे पठारे यांनी 'रीट्रेचमेंट' या कथेपासून मराठी साहित्य क्षेत्रात प्रवेश केला. तेव्हापासून आज पर्यंत पठारे यांची लेखणी अव्यहातपणे सुरू

आहे. रंगनाथ पठारे यांनी आतापर्यंत एकूण १४ कादंबऱ्यांचे लेखन केले आहे त्यांच्या चौदाही कादंबऱ्यांचे विषय वैविध्यपूर्ण व वेगवेगळे आहेत पठारे यांनी आपल्या लेखनातून राष्ट्रीय आणीबाणी, वाङ्मयीन पर्यावरण, सहकार, राजकारण, समाजकारण , विद्यापीठ क्षेत्रातील हेवेदावे , स्त्री – पुरुष नातेसंबध अशा विविध विषयांना कवेत घेणारे लेखन पठारेंच्या कादंबऱ्यातून आपल्याला आढळून येते पठारे यांच्या सर्वच कादंबऱ्या अतिशय दर्जेदार आहेत पठारे यांच्या 'ताम्रपट' सारख्या बृहत् कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेला आहे

'भर चौकातील अरण्यरुदन' ही कादंबरी २००८ साली प्रकाशित झाली आहे. या कादंबरीचा प्रारंभ सुनील निकाळजे या नावाच्या नवोदित पत्रकाराच्या वृत्तांकनापासून झालेली आहे परंतु सुनील निकाळजे हा या कादंबरीचा नायक नसून या कादंबरीचा नायक हा खऱ्या अर्थाने मल्लराज सिद्रामप्पा होसमुनी हा आहे कादंबरीची सुरुवात ही पत्रकारितेच्या दुनियेमध्ये सुस्थापित होऊ पाहणाऱ्या एका तरुण तडपदार होतकरू पत्रकार सुनील निकाळजे ह्यांच्या पासून झाली आहे. ही कादंबरी शोषित, पिडीत, नैतिक अनैतिकतेच्या रगड्यात सापडलेल्या, भांडवलवादी वृत्तीच्या सरंजामी व्यवस्थेत शोषण झालेल्या, आणि या व्यवस्थेचा हकनाहक बळी ठरणाऱ्या असंख्य मानवी जीवन मल्लराजाच्या रूपातून मांडलेली वेदना आहे मल्लराजाची वेदना मांडत असतानाच पठारे यांनी दुसऱ्या बाजूला पत्रकारितेमध्ये धडपडणाऱ्या सुनील निकाळजे यांच्या अंतर्मनाचा ठाव देखील या कादंबरीतून घेतला आहेया कादंबरीच्या आशयाविषयी सांगताना डॉ. राजेंद्र सलालकर म्हणतात की, "मल्लराज होसमुनी हा सरंजामी व्यवस्थेच्या दृष्टीने पतित माणूस जन्म ते मृत्यूपर्यंतचे त्याचे जीवन अत्यंत करूण. त्याची दखल घेण्याचं कारण नाही असा तो माणूस असला तरी त्याला माणूस म्हणून मान्यता नाही. व्यवस्थेतल्या काही खास माणसांसाठी तो उपयोगाची किंवा उपभोगाची वस्तू. परंतु त्याच्या आत मध्ये मन नावाचे इंद्रिय आहे,याची दखल घेणारा एखादा सुनील निकाळजे असू शकतो. समान धर्म म्हणून त्याच्याशी जोडला जातो त्याच्या जीवनाचा शोध घेऊ लागतो. यशोदा त्याला जे विदारक सत्य गवसते, त्याच्याशी त्याची झुंज सुरू होते त्यामुळे त्यांचे जगणे बाह्य जगापासून अलिप्त पण आतून उकळत्या लाव्हारसासारखे होते"[1] या सलालकर यांच्या अभिप्रायावरून आपल्याला एकंदरीत कादंबरीच्या आकृतीबंधाचा अंदाज घेतो

'संध्या' या नावाच्या दैनिकात काम करणारा उपसंपादक म्हणून सुनील निकाळजे हा वृत्तपत्राकरिता जाहिराती मिळविण्यासाठी धडपडत असतो. एकदा ठाण्यामध्ये फिरत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याशी उपोषण करताना मृत्युमुखी पडलेल्या मल्लराज होसमुनी याच्याकडे त्याचे लक्ष जाते"मल्लराज सिद्रामप्पा होसमुनी हे या ठिकाणी आज रोजी प्राणांतिक उपोषणाला बसले हायेत. त्ये भवारी मल शेठच्या कामात मजुरी करत व्हते. आनेक प्रयत्ने करून त्यांची मजुरी शेठनीधिली नायी. आपलं गाऱ्हानं जनतेसंबोर मांडण्यासाठी इथ बसल्यालेहायेत."[2] या फलकाने सुनीलचे लक्ष वेधल्या जाते आणि तो मल्लराजच्या मृत्यूचे गुढ जाणून घेण्यासाठी त्याची उत्सुकता वाढत जाते.मल्लराज चा शेजारी असलेल्या संपत यलमामे कडून तो मल्लराज संबंधी संपूर्ण माहितीमिळवतो. आणि त्याला न्याय मिळवून

देण्यासाठी त्याच्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आपल्या वृत्तपत्रातून बातमी लावण्यासाठी प्रयत्न करतो. यासाठी तो संपादक असलेले बाबुराव कणसे यांना फोन करून घडलेल्या घटनांचा वृत्तांत कळवतोसंबंधित बातमी न्यूज चैनल च्या संपादकांना देऊन बाबुराव कणसे देखील मल्लराजच्या मृत्यूचं भांडवल करताना दिसतातअशा प्रकारची या कादंबरीची सुरुवात रंगनाथ पठारे यांनी रेखाटली आहे

सुनील निकाळजे हा मल्लराजला न्याय मिळवून देण्यासाठी व त्याला न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस स्टेशनला पोलीस अधिकाऱ्याकडे जातो. तेथे गेल्यावर पोलीस स्टेशन मधील फौजदार त्याला अंडरवर्ल्ड डॉन दीपक निकाळजे चा नातेवाईक समजून त्याची विचारपूस करतो "ठीक आहे. ठीक आहे. पण भाऊंनीच लक्ष घातलेलं आहे, ही समज एकदा मिळाली की नक्कीच काहीतरी न्याय्य मिळेलं या माणसाला. हलणारच बघा डिपारमेन. मीच हलवतो ना! म्हणजे, तो माणूस तर मेला बिचारा. सालं कोणाचंच लक्ष नाही गेलं त्याच्याकडं! काल मीच होतो ड्युटीवर. मीच केलं सारं. अन् चौकशीही करतोच आहे. त्या भवरीमलला सोडत नाही बघा. सगळे पुरावे उभे करून नीट कोर्टात खेचतो त्याला. सणसणीत भरपाई द्यायला लागेल अन् शिक्षाही झालीच पाहिजे साल्याला. फार माज चढलाय या धनदांडग्या लोकांना पैशानं काहीही विकत घेता येतं अशी पक्की समज असते त्यांची अडकवला लगेच आम्ही पण सुटला जामीनावर. पण धरतो पुन्हा. पक्कं लावून धरतोय मी तुम्ही सांगून द्या भाऊंना अन्कोर्टाबाहेर काही सेटलमेंट करायच्या दिशेनं काही करायचं असलं तर तसंही अगदी हाग्या दम भरतो साल्याला. भाऊंनी लक्ष घातलंय असं सांगितलं नुसतं तरी फळाफळा मुतंल ते' 'कोण हे भाऊ?"[३] या फौजदाराच्या वक्तव्यातून सुनील आश्वस्त होतो परंतु पोलीस प्रशासन बिल्डर लॉबी विरु काहीही करत नाही. कादंबरीचे कथानक पुढे जात असताना लेखक मध्येच सुनीलचे वैयक्तिक आयुष्य देखील उलगडायला सुरुवात करतो. सुनील चे बालपण, त्याची कौटुंबिक परिस्थिती, शिक्षण, त्याची मुंबईमधील धडपड, सेक्स विषयक त्याची मते, महानगरातील बकाल वातावरण आणि त्याविषयीचे सुनीलचे निरीक्षण, त्याचे स्पॉटलेखन, कथा आणि कविता लिहिण्याचे त्याचे प्रयत्न, लेखन विश्वात चाचपडण्याची त्याची वृत्ती, गिरगावात आमलेट पावच्या गाडीवर बसून त्याची दारू पिणे, स्वतःशी असलेला संवाद, यमाजी सोबत वेश्यालयात जाणे, तेथून काही न करता पळून जाणे अशा प्रकारचे सुनीलचे वैयक्तिक आयुष्य देखील पठारे यांनी अतिशय उत्तमरीत्या रेखाटले आहे

सुनील एक दिवस मल्लराजचा शेजारी असलेला यलमामे आणि मल्लराजची पत्नी चेन्नम्मा हिची भेट घ्यायला त्यांच्या ठाण्यातील झोपडपट्टीत जातो. चेनम्मा ही कानडी भाषिक असल्याने तिला मराठी बोलता येत नाही. म्हणून तिच्या वतीने संपत यलमामे मल्लराजची करूण कथा सांगतो तेव्हा त्याला कळते की मल्लराज हा कर्नाटकातून रोजगारासाठी मुंबईत आलेला होता परंतु त्याचे नाव, गाव, कुळ, गोत्र याविषयी कुठलीही माहिती त्याला मिळत नाही. रोजगाराच्या शोधात आलेला होसमुनी एका हॉटेलमध्ये कामगार म्हणून काम करू लागतो. तेथे आलेल्या कन्नड भाषिक पुट्टाप्पा आणि चेन्नम्मा या जोडप्याशी त्याची ओळख होते. त्या ओळखीवरून होसमुनी त्यांच्या घरी जाऊ येऊ लागतो त्यांच्या घरातील

किरकोळ कामे सुट्टीच्या दिवशी करत असतो. पुटाप्पा हा अंडरवर्ल्ड टोळीतकाम करत असतो. त्यामुळे तो अनेक दिवस घराबाहेर असतो तरी देखील मल्लराज चे त्यांच्या घरी येणे जाणे असते चेनम्मा त्याच्याशी आपुलकीने वागते. एके दिवशी असेच कामावर गेलेला चेनम्मा चा नवरा टोळी युद्धात मारला जातो. ती मुंबईसारख्या महानगरात एकटी पडते त्यामुळेजवळ असलेला काही पैसा घेऊन ती मल्लराज सोबत ठाण्याला भैरोबाच्या नाल्या जवळच्या एका झोपडपट्टीमध्ये राहू लागते. या झोपडपट्टीत मल्लराज ची ओळख नरसय्या नावाच्या कन्नड भाषिक इसमाशी होते. आणि तो हॉटेलमधील काम सोडून नरसय्या च्या माध्यमातून बांधकाम कामगारांच्या टोळीमध्ये शंभर रुपये रोजाने सहभागी होतो. आणि चेनम्माला तो इस्पितळात नर्स म्हणून कामाला लावतो. पुढे काही दिवसांनी मल्लराज आणि चेन्नम्मा पती-पत्नी सारखे राहू लागतात. या बांधकाम टोळीच्या कामामुळे मल्लराज आजारी पडतो आणि पुढे तो काम सोडून देतो नरसय्या च्या सल्ल्यानुसार तो लिंगप्पा या कन्नड सावकाराकडून कर्ज घेऊन घरांच्या पाया खोदायचं काम करण्यासाठी गाढव खरेदी करतो. मल्लराज आणि त्याची पत्नी चेनम्मा हे दोघेही मेहनत करून कर्जाची रक्कम फेडून टाकतात परंतु याच लिंगप्पा सावकारामुळे पुढे चेन्नम्मा चे अपहारण, चेन्नमाची अब्रु लुटणे, लिंगप्पाची हत्या आणि मल्लराजचा दुर्दैवी मृत्यू देखील होतो.

तर पुढच्या भागात कादंबरीची प्रत्यक्ष निर्मिती प्रक्रिया करताना सुनील मल्लराजाचा भूतकाळ शोधून काढण्याचा प्रयत्न करतो. सुनील आपले मुळगाव असलेल्या गुनाठ या गावी बैजूआज्जा ला भेटण्यासाठी जातो गावातील मराठा पाटील असलेला सुनीलचा बालमित्र आनंदराव पाटील त्याला भेटायला येतो आणि संध्याकाळच्या जेवणासाठी घरी येण्याचे निमंत्रण देतो. गावातील मातंग वाड्यात ही गोष्ट वाऱ्यासारखी पसरते. त्यावेळी आनंदराव पाटील यांच्या पत्नीची सुनील शी ओळख करून देतात. आनंदराव पाटलाची पत्नी ही कर्नाटकातील होसमुनी गावची असते. तिच्याशी बोलताना तो सिद्रामाप्पा होसमुनी आणि त्याचा मुलगा म्हणजेच मल्लराज सिद्रामाप्पा होसमुनी विषयी तिच्याकडे विचारना करतो. तेव्हा ती तो सिद्रामाप्पा होसमुनी ला ओळखत असल्याची सांगते ते त्यांच्या भावकीतीलच असल्याचे देखील सांगते. परंतु त्यांच्या मुलाचे नाव मल्लराज नसून त्यांना एकुलता एक मुलगा रामकृष्ण नावाचा असल्याचे सांगते आणि रामकृष्ण वारले असून त्यांचा मुलगा शंभू स्वामी सध्या असल्याचे सांगते. या नवीन माहितीमुळे मल्लराज बद्दल सुनीलच्या मनात आणखी कुतूहल निर्माण होते आणि तो आनंदरावच्या सासुरवाडीला म्हणजे कर्नाटकात जायचे ठरवतो बेळगाव, कारवार, जमखंडी, सोंडूर जिंजी, तंजावर असा प्रवास करतो होसमुनी या गावी आनंदराव पाटलाचा मेहुणा हरिहर पाटील यांच्या वाड्यावर मुक्कामी येऊन पोहोचतो. तेथे तो सिद्रामाप्पा होसमुनी विषयी विचारणा करतो. तेव्हा तेथे सिद्रामाप्पा होसमुनी यांची विधवा सून दमयंतीबाई यांच्याशी भेट होते सुनील हरिहर पाटलाच्या मळ्यातील घरात वास्तव्यास जातो. हरिहर पाटील त्याला सिद्रामाप्पा होसमुनीनी ठेवलेल्या बाईच्या मुलाविषयी म्हणजे मल्लराज विषयी सांगतो. सुनील पुढे मल्लराज च्या जन्माचे प्रकरणच लिहून काढतो. मल्लराज आणि त्याची आई नागव्वा तिचे सिद्रामाप्पा होसमुनी ची रखेल

म्हणून त्याच्यामुळे राहणे, मल्लराजाचा जन्म, त्याचे सात वर्षांपर्यंतचे वाढणे, सिद्रामाप्पा होसमुनी चा दुसरा विवाह, त्याच्या दुसऱ्या विवाहानंतर त्यांची तेथून झालेली हकालपट्टी, गुलबर्गा गावात नागव्वा चा देहविक्री व्यवसाय, परत सिद्रामाप्पा होसमुनी चे गुलबर्गा येथे तिच्याकडे येणे, मल्लराजला आपल्यासोबत सिद्रामाप्पा होसमुनी मळ्यात घेऊन जाणे, तेथे कामाला जुंपणे, मल्लराजचा तारुण्यात प्रवेश, सिद्रामाप्पा होसमुनी चा मुलगा रामकृष्ण आणि सोंडून येथील दमयंती यांचा विवाह, आणि रामकृष्ण दमयंतीला अपत्य देण्यास असमर्थ असल्याची बातमी, दमयंती आणि रामकृष्ण यांचे वारंवार मळ्यामध्ये वास्तव्यात जाणे, दमयंतीचेआपल्या मैत्रिणीकडून वैद्यकीय सल्ला घेणे, अपत्य प्राप्तीसाठी दमयंतीचे मल्लराज सोबत शारीरिक संबंध ठेवणे, आणि सिद्रामाप्पा होसमुनी कडून पकडले गेल्यावर त्याला स्पष्टपणे वस्तुस्थिती सांगणारी दमयंती, आणि कुऱ्हाडीने खांडोळी करण्याची मल्लराजला धमकी देणारी दमयंती, मळ्यातून मल्लराजला पिटाळून लावणारी दमयंती, शंभू स्वामी चा जन्म, आदि प्रसंग या भागात सुनीलने रेखाटले आहे पुढे सुनील आपल्या पत्रकारितेच्या भागात प्रवेश करत असताना महानगर या दैनिकामध्ये संपादक कर्णिक यांच्याशी भेट होणे आणि महिनाभरामध्ये छापून आलेल्या त्यांच्या लेखाचे मानधन घेणे आणि त्या वृत्तपत्रातील तो नोकरी स्वीकारतो पुढे कौसल्या नावाच्या प्राध्यापक असलेल्या मुलीशी त्याच्या विवाहाचा मानस व्यक्त करणारे त्याचे आई वडील, भाऊ वहिनी, कौसल्याचे सुनीलशी विवाह करण्यास सहमती, वर्षे दोन वर्षे थांबण्याची तयारी आदि घटना येते परत सुनील मल्लराज होसमुनीचा उपोषण आणि मृत्यू या भागाकडेवळतो. या चेनम्माने लिंगप्पा सावकारा विरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार करणे, तिला सोडवायला गेलेल्या मल्लराजाला पोलिसांकडून मारहाण होणे आणि तिला पोलीस स्टेशन मधून लिंगप्पा ने उचलून नेणे, लिंगप्पा आणि झोपडपट्टीतला दादा ताराचंद यांचे लागेबांधेआंबेडकर पुतळ्यापाशीमल्लराजाने उपोषण सुरू करणे, चेन्नम्माला कोकणातील फार्म हाऊस वर नेऊन ठेवणे, निवडणुकीचा कालखंड असल्याने मल्लराज उपोषणाकडे पोलीस प्रशासनाने सोयीस्करपणे दुर्लक्ष केले अर्थात त्यासाठी लिंगप्पाणे पोलीस डिपार्टमेंटला पुष्कळचे वजन देखील दिलेहीच संधी साधत लिंगप्पाने चेन्नम्मावर बलात्कार केला. असाच एके दिवशी लिंगप्पा सावकार आला असताना चेनम्मा ने कोयत्याने वार करून लिंगप्पाची हत्या केली आणि त्या फार्म हाऊस वरून पळ काढला आणि थेट पळत मुंबई गाठत आंबेडकर जवळ उपोषणाला बसलेल्या मल्लराज जवळ पोहचली. चेन्नमाच्या मांडीवर मल्लराज ने अखेरचा श्वास घेतला. आणि वाचकांना वाटेल की इथे कादंबरीचे कथानक संपले परंतु पुन्हा येलमामे आणि चेन्नम्मा यांचा एक नवा आणि काहीसा आश्चर्यकारक वाटावा असा एक नवीन अध्याय अगदी संक्षेपाने पठारेनी रेखाटला आहे. मल्लराज विषयी कुणालाही माहीत नसणारी गोपी ते सुनील निकाळजेला माहीत झाल्यानंतर कदाचित त्याचा खुलासा करण्यासाठी तो यलमामे याला सोबत घेऊन चेन्नमा कडे जाण्याच्या बेतात होता. संपत यलमामेच्या घरी गेल्यावर संपतची पत्नी त्याला संपत आणि चेनम्मा यांच्या अनैतिक संबंधा बद्दल सांगतेपरंतु सुनील चा यावर विश्वास नबसल्याने तो चेनम्माच्या झोपडीकडे चालू लागतो. झोपडीचे बंद असलेले दार आणि सुनील च्या हाकेने आतून गडबडत येणारा संपत बरेच काही

सांगून जातो " हये चुकीच हये मपली. पन काय करावा ? ती येकली बाई. नजिक आलो. चट लागली.' संपत संक्षिप्तपणे म्हणाला. कबुलीजबाबच यावर बोलण्यासारखं सुनीलजवळ काहीच राहत नाही

'पन मान्सानलायबी टाखल्यालं नायी म्या. मी सांगतो तिला; तुला काय कमी पडात का ?"[3] अशा शब्दात त्याच्या पत्नीने सांगितलेल्या गोष्टींची पुष्टी करतो आणि इथे कादंबरीचे कथानक संपते भर चौकातील अरण्यरुदन ही कादंबरी म्हणजे मल्लराज होसमुनी या गरीब , हताश कामगाराच्या संघर्षाची करुण कहाणी आहे भांडवलशाही आणि सरंजामी व्यवस्थेमध्ये गरीब माणूस कशाप्रकारे लुबाडल्या जातो आणि त्याची कसे शोषून होते त्याची कशी विटंबना होते हा या कादंबरीचा मूळ गाभा आहे मल्लराज होसमुनीचे पाचशे रुपये घेऊन भवारीमल शेठ बाहेरगावी पळून जातो त्यामुळे दुसरीकडे लिंगप्पा या झोपडपट्टीतील सावकाराने मल्लराज होसमुनी ची बायको चेनम्मा हिला पोलीस स्टेशन मधून अपहरण करून नेल्यावर तो पोलिसांकडे न्याय मागतो परंतु त्याला तिथे न्याय मिळत नाही यामुळे हताश झालेला मल्लराज हा ठाण्यातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ या अन्याय अत्याचारा विरोधात उपोषणाला बसतो. परंतु दुर्दैव या व्यवस्थेचे की त्याच्याकडे कोणाचेही लक्ष जात नाही निवडणुकीची धामधूम असल्यामुळे मल्लराजाच्या उपोषणाकडे कोणीही जात नाही किंबहुना कोणालाही त्याची देणे घेणे नाही. मल्लराजाच्या मृत्यूनंतर आवाज उठवणारे न्यूज चॅनल आणि वृत्तपत्रांच्या दुनियेमध्ये जिवंत माणसांच्या जगण्याला काहीही किंमत नाही ही वस्तुस्थिती पठारे **यीं** या कादंबरीच्या माध्यमातून अधोरेखित केली आहे

**संदर्भ :**


1. 'भर चौकातील अरण्यरुदन', सलालकर राजेंद्र, , सक्षम समीक्षा, रंगनाथ पठारे साहित्य विशेषांक डिसेंबर २०१९, पृ. क्र.७४.
2. पठारे रंगनाथ, 'भर चौकातील अरण्यरुदन', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. डिसेंबर २००८,पृ. क्र.१२.
3. तत्रैव, पृ. क्र.४६. २९८